९९ एस. सी.आर. सर्वोच्च न्यायालय अहवाल/वार्तांकन.(१९५५)

शंकर सीताराम सोनटक्के आणि आणखी एक

-विरुद्ध-

बाळकृष्ण सीताराम सोनटक्के आणि इतर.

(१२एप्रिल,१९५४)

[मेहरचंद महाजन मा.मुख्यन्यायमूर्ती,मा.न्यायमूर्ती सर्वश्री विवियन बोस आणि गुलाम हसन .]

संमतीचा हुकूम- त्याचा कायदेशीर परिणाम- फसवणूक, चुकीची मांडणी, गैरसमज किंवा चुकांमुळे तडजोड दूषीत होत नाही- त्या नुसार दिलेला हुकूमनामा-पूर्व न्यायनिर्णयाच्या प्रतिबंधाच्या तत्वाने प्रभावीत होतो कां? दिवाणी प्रक्रिया संहिता (१९०८ चा पाचवा कायदा) आदेश- २, नियम 2 (3)-पूर्वीच्या दाव्यातील सोडून दिलेली मागणी, अशा प्रकारे वगळली गेली असल्यास, ती मागणी,नंतरच्या दाव्याच्या संदर्भात प्रतिबंधीत होते.

हे सर्वस्वी निश्चित आहे की, उभयपक्षांच्या सहमतीने पारीत केलेला तडजोडीचा आदेश/हुकूमनामा, उभयपक्षांवर बंधनकारक असतो. जेथे फसवणूक, चुकीची मांडणी यामुळे तडजोड दूषित होत नाही असे आढळते, अशा प्रकरणात पूर्व न्याय निर्णयाच्या प्रतिबंधाचे प्रभावामुळे, तडजोडीचा आदेश/ हुकूमनामा हा उभयपक्षांवर बंधनकारक ठरतो.जेथे न्यायनिर्णय गैरसमज किंवा चूक यावर आधारित नसतो व त्यानुसार पारित केलेल्या हुकुमनाम्या मध्ये पूर्वन्यायनिर्णयाच्या तत्वाची प्रतिबंधात्मक शक्ती असते.

जेंव्हा वादी त्याची मागणी ही एका विशिष्ट तारखेपर्यंतच्या कालावधीसाठी मर्यादित ठेवून, हिशोबासाठी आपला दावा विशिष्ठ तारखे पुरता सिमित ठेवतो तेंव्हा स्पष्टपणे नमूद केले नसल्यास, अप्रत्यक्षपणे, तो त्याचा दावा त्या कालावधीसाठी मर्यादित ठेवतो, त्यानंतरच्या कालावधीसाठी तो आपला दावा हिशोबातून सोडून देतो. कारण, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश 2, नियम 2 (3) मध्ये असे नमूद केले आहे की, जर एखाद्या व्यक्तीने ज्या सर्व सवलतींसाठी तो पात्र आहे, त्यासंबंधी खटला दाखल करण्याबद्दल न्यायालयाची परवानगी घेतली नाही, तर त्यासाठी तो नंतर दावा दाखल करु शकणार नाही.अशा प्रकारे वगळलेल्या कोणत्याही सवलतीसाठी त्याला खटला दाखल करता येणार नाही.

दिवाणी अपील अधिकारिता - दिवाणी अपील क्र.११३/१९५३.

उच्च न्यायालयाच्या (सर्वश्री न्या.बावडेकर आणि दीक्षित.) अपीलक्र.५५४/१९५१मधील दि.२५ मार्च,१९५२ रोजीच्या निकाला विरुद्धचे अपील,जे विशेष दिवाणी दावा क्र.१२/१९४९

मधील दि.३०जून,१९५१रोजीच्या ठाण्याच्या वरीष्ठ दिवाणी न्यायाधीशांच्या न्यायनिर्णय आणि हुकुमनाम्या वरुन उद्भवले होते.

अपीलकर्त्यांसाठी:- श्री के.एस.कृष्णस्वामी अय्यंगार (सर्वश्री जे. बी. दादाचंदजी, व्ही. बी. रेगे आणि गणपत राय यांच्यासह)

उत्तरवादींसाठी:- श्री एस.बी.जठार,आर.बी.कोतवाल आणि नौनितलाल यांच्यासह.

न्यायालयाने आपला निर्णय दि.१२ एप्रिल,१९५४ रोजी न्यायमूर्ती गुलामहसन यांच्या द्वारे पारीत केला.

(- न्या.गुलाम हसन-)

प्रस्तुतचे अपील हे मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या परवानगीने,उच्च न्यायालयाच्या विभागीय खंडपीठाच्या(सर्वश्री न्यायमूर्ती बावडेकर आणि दीक्षित)दि.२५मार्च,१९५२रोजीच्या न्यायनिर्णय आणि हुकूमनाम्या विरुध्द दाखल करण्यात आले आहे, ज्या द्वारे ठाणे येथील वरीष्ठ दिवाणी न्यायाधीशांच्या दि.३०जून,१९५१रोजीच्या न्यायनिर्णयात आणि हुकूमनाम्यामध्ये सुधारणा व बदल करण्यात आला होता.

हे अपील हिंदु संयुक्त कुटुंबाच्या सहा भावांच्या दरम्यानच्या वाटणी संबंधीचे आहे. या संयुक्त कुटुंबाचे किराणा मालाचे दुकान, दारुची दुकाने,स्वस्त धान्याचे दुकान,मोटर बससेवा,आणि सावकारीचा व्यवसाय इ.व्यवसाय “सोनटक्के बंधु” या नावाने चालविले जात होते.या कुटुंबाकडे स्थावर आणि जंगम मालमत्ता देखील होती.बाळकृष्ण सीताराम सोनटक्के हे

भावांमध्ये सर्वात मोठे आहेत आणि सध्याच्या अपीलात उत्तरवादी (दाव्यात वादी) आहेत.त्यांचा उल्लेख यापुढे वादी म्हणून केला जाईल.दाव्यास सामान्य कारण हे आहे की, १९४४ पर्यंत हे बंधू एकत्रच राहत होते,एकत्रच जेवणखाण करीत होते.कुटुंबाचे व्यावसाईक उत्पन्न वादीकडेच ठेवले जात होते. १४एप्रिल,१९४५ पासून परिस्थिती बदलली आणि कुटुंबियांनी आपापल्या व्यवसायाच्या उत्पन्नाचा वेगळा हिशोब ठेवणे व खर्च करणे सुरु केले.वादी दारूची दुकाने चालवीत होता, प्रतिवादी क्रमांक १ आणि २, जे अपीलकर्ते आहेत, मोटार-बस,नोकरी/ व्यवसाय करत होते, तर प्रतिवादी क्रमांक ४ किराणा दुकान चालवत होता.पक्षकारांनी मध्यस्थ/लवादांच्या माध्यमातून आपसात हिस्से वाटप करण्यचा प्रयत्न केला, परंतु तो प्रयत्न अयशस्वी ठरला.२९ जून १९४५ रोजी या पाचही भावांनी त्यांच्या व्यावसाईक खात्यांसह, सर्व संयुक्त कुटुंबाच्या मालमत्तांच्या वाटणीसाठी वादी विरुद्ध दावा दाखल केला.याचा दावा क्रमांक३९/१९४५असा होता.७ मार्च १९४६रोजी त्यात तडजोड करण्यात आली.या तडजोडीद्वारे असे घोषित करण्यात आले की, १९४२ पूर्वी विविध व्यवसायांची सर्व खाती योग्यरित्या ठेवली गेली होती आणि दर्शविली गेली होती, १९४२ ते ३१ मार्च १९४६ पर्यंतच्या खात्यांची तपासणी करण्यासाठी आणि त्या तारखेपर्यंत देय रक्कम निश्चित करण्यासाठी न्यायालयाद्वारे लवाद नियुक्त करण्यास पक्षकारांनी सहमती दर्शविली होती.लवादांकडून खात्यांची तपासणी केल्यानंतर, ३१मार्च, १९४६रोजी आढळलेल्या रोख शिल्लक रकमेचा सहावा भाग प्रत्येक भावाला मिळणार होता.सर्व कौटुंबिक व्यवसायांच्या व्यापारातील साठ्यासह संयुक्त कुटुंबाची सर्व जंगम मालमत्ता सर्व भावांमध्ये समान प्रमाणात विभागली जाणार होती.तडजोडीने पुढे घोषित केले होते की, मोटर गॅरेजमध्ये वादीचा एक

षष्ठांश हिस्सा असेल आणि प्रतिवादी १ आणि २ त्याला एक षष्ठांश भागाची किंमत देतील.तडजोडीची ही महत्वाची तरतुद होती. एक भाऊ अल्पवयीन होता आणि न्यायालयाने ही तडजोड अल्पवयीन व्यक्तीच्या फायद्यासाठी असल्याचे लक्षात घेऊन, ती स्वीकारली आणि २५ जुलै १९४७ रोजी तडजोडीच्या संदर्भात एक प्राथमिक हुकूमनामा पारीत केला गेला.घटनांच्या नैसर्गिक मार्गात अडथळा आणणारे दुसरे काहीही घडले नसते, तर हुकूमनाम्याच्या अंमलबजावणी ची कारवाई, वाटपाच्या अंतीम हुकूमनाम्याने संपली असती.३१ मार्च १९४६ नंतर, प्रतिवादी क्रमांक 1 आणि 2 यांनी चालवलेल्या मोटार व्यवसायाचा नफा आणि मालमत्तेच्या त्याच्या वाट्यापुरती आपली मागणी मर्यादित ठेवून, वादीने २३ फेब्रुवारी १९४९ रोजी नव्याने दावा दाखल केला.त्याचे म्हणणे असे होते की, तडजोड ही घाईघाईने करण्यात आली होती, उभय पक्षांनी तडजोड करतांना भविष्यातील त्यांच्या वर्तनाबद्दल उल्लेख करणे टाळले होते,१एप्रिल १९४६ पासून मोटार व्यवसाय हा अजूनही संयुक्त कुटुंबाचा व्यवसाय होता आणि ३१ मार्च, १९४६ नंतर त्या व्यवसायाचा हिशोब मागण्याचा त्याला अधिकार होता.

बचावात अशी मांडणी करण्यात आली होती की, योग्य विचारविनिमयानंतर तडजोड करण्यात आली होती, मोटार व्यवसाय आणि किराणा दुकानाच्या खात्याचा हिशोब प्रत्यक्षात १४ एप्रिल १९४५ पर्यंत घेतला गेला पाहिजे होता, जी संयुक्त कुटुंबाचा दर्जा संपुष्टात आणणारी तारीख होती, परंतु; दोन्ही पक्षांनी तडजोडीद्वारे सहमती दर्शवली होती की, सर्व कौटुंबिक व्यवसायांचा हिशोब ३१ मार्च, १९४६ पर्यंत घेतला जावा.पूर्वन्यायनिर्णयाच्या प्रतिबंधाच्या तत्वाने (रेस ज्युडीकेटाने) या दाव्याला मनाई आहे, असा युक्तिवादही करण्यात आला.या

खटल्यातील मुद्द्यांवर दिवाणी न्यायाधीशांना असे आढळून आले की, १९४५ च्या ३९ क्रमांकाच्या आधीच्या खटल्यातील निर्णयामुळे दावा प्रतिबंधित होत नव्हता, त्या खटल्यातील निर्णय फसवणूक आणि चुकीच्या समजूतीतून झालेला नव्हता आणि मागील खटल्यातील तडजोड चुकांमुळे किंवा चुकीच्या समजूतीतून झाली नव्हती.हे निष्कर्ष काढूनही दिवाणी न्यायाधीशांनी असे म्हटले की, वाटपानंतर चाललेला मोटार व्यवसाय हा जरी संयुक्त कुटुंब व्यवसाय राहिला नसला, तरी तो कुटुंबातील काही सदस्यांद्वारे चालवला जात असल्याने, त्यांची स्थिती, वाटपा नंतर, भागीदारीत व्यवसाय चालविणाऱ्या भागीदारां सारखी होती आणि भागिदारी अधिनियम, कलम ३७ मध्ये अंतर्भूत असलेले तत्त्व लागू करुन त्यांनी असे म्हटले की, मोटार व्यवसाय चालविणारे दोन भाऊ त्या व्यवसायासाठी जबाबदार आहेत.त्यानुसार त्यांनी ३१ मार्च, १९४६पासून मोटार व्यवसायाची खात्यांचा हिशोब घेण्याचे निर्देश देणारा एक प्राथमिक हुकूमनामा पारीत केला, त्यानुसार निर्देश देण्यात आले होते की, ३१ मार्च, १९४६ पासून ते अंतीम हुकूमनाम्याच्या तारखेपर्यंत,मोटार व्यवसायाचा हिशोब करण्यात यावा.मोटार व्यवसाय करणाऱ्यां व्यतिरिक्त इतर भावांच्या समभागांच्या भांडवलाच्या वापरातून मिळणारा नफा निश्चित करण्यासाठी, हिशोब घेण्यासाठी एका आयुक्ताची नियुक्ती करण्यात आली होती.अपीलात न्यायमूर्ती बावडेकर यांनी, ज्यांच्याशी न्यायमूर्ती दीक्षित यांनी सहमती दर्शवली, व्यवसाय बंद होण्याच्या तारखेपर्यंत खाती घेतली जावीत आणि अंतीम आदेशाच्या तारखेपर्यंत नाही, असे निर्देश देऊन खालच्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यामध्ये सुधारणा केली.

विद्वान न्यायाधीशांनी असे मत मांडले की, सध्याच्या खटल्याच्या कारवाईचे कारण मागील खटल्यातील कारवाईच्या कारणापेक्षा वेगळे होते आणि दावा दिवाणी प्रक्रिया

संहिता,आदेश-२,नियम,(२)मध्ये अनुस्यूत असलेल्या पूर्व न्यायनिर्णयाच्या तत्वाने प्रतिबंधीत नव्हता.

काही परस्पर विरोधी निरीक्षणे नोंदविल्या नंतर, ज्याचा तपशीलवार संदर्भ दिला जाईल, त्यांनी असे मत व्यक्त केले की, संमतीचा हुकुमनामा मोटार वाहतूक व्यवसायाच्या खात्यांच्या हिशोब घेण्यासंबंधीच्या अधिकारांच्या संदर्भात स्पष्टपणे नकारात्मक नाही.शेवटी विद्वान न्यायाधीशांनी असा निष्कर्ष नोंदवला की, या प्रकरणातील युक्तिवादांचा फारसा विचार न करता,ते या निष्कर्षाप्रत पोहचले आहेत की, प्रतिवादी क्रमांक १ आणि २ यांनी संयुक्त कुटुंब मालमत्तेचा वापर केला होता आणि ते सह-भागीदारांच्या स्थितीत आले होते आणि भारतीय विश्वस्त कायद्याच्या कलम ९० मध्ये विचार केल्याप्रमाणे, उभय पक्षांच्या मालकीच्या मालमत्तेच्या संयुक्त वापरास कारणीभूत असलेल्या नफ्याचा हिशोब देण्यास ते जबाबदार होते.

अपीलकर्त्यांच्या विद्वान वकिलांनी, त्यांच्या विरुद्ध निर्णय घेतलेल्या सर्व मुद्द्यांवर उच्च न्यायालयाच्या दृष्टिकोनास आव्हान दिले आहे.त्यांनी असा युक्तिवाद केला आहे की, दिवाणी खटला दाखल होण्याचे कारण म्हणजे, कुटुंबाची वेगळे होण्याची इच्छा आणि हेतू हेच आहे, दोन्ही खटले दाखल होण्याचे कारण एक समान आहे आणि वेगळे नाही आणि सबब, दावा पूर्व न्यायनिर्णयाच्या प्रतिबंधाच्या तत्वाने तसेच,दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश-२,नियम (२) दोन्ही द्वारे प्रतिबंधित आहे.विद्वान वकिलांनी भारतीय विश्वस्त कायद्याच्या कलम ९० या प्रकरणी लागू करण्याच्या उच्च न्यायालयाच्या दृष्टिकोनासही आव्हान दिले आहे.आम्हाला असे वाटते की, तेंव्हाची परिस्थिती लक्षात घेता, उभय पक्षांमधील तडजोडीचे योग्य वाचन केल्यावर, असा एकच वैध निष्कर्ष निघू शकतो की,उभय पक्षांनी सर्व खात्यांचा

हिशोब घेऊन तो ३१मार्च,१९ ४६ पर्यंत मर्यादित ठेवण्यास सहमती दर्शविली होती आणि त्या द्वारे तो हिशोब पुन्हा घेण्याचे दरवाजे बंद केले होते.जर उभय पक्षांकडून पूर्ण विचार केल्यानंतर तडजोड केली गेली असेल आणि सुनावणी करणाऱ्या न्यायालयाने (ट्रायल कोर्टाने) ठरविल्याप्रमाणे तडजोड ही फसवणूक, चुकीची मांडणी, चूक किंवा गैरसमज यामुळे दूषित झाली नसेल- ज्या निष्कर्षात उच्च न्यायालयाने हस्तक्षेप केलेला नाही- तर त्यावरुन असे स्पष्ट होते की, एकदा पक्षकारांनी तडजोडीच्या आधारे सहमतीने वाद मिटवला असेल, तर ते प्रकरण आता पुन्हा सुनावणीला घेतले जाऊ शकत नाही.कोणत्या कारणांमुळे उभय पक्षांना हिशोब घेण्याचा कालावधी ३१ मार्च, १९४६ पर्यंत मर्यादित ठेवावा लागला आणि पुढील कलावधीचा हिशोब थांबवावा लागला, जो सामान्यतः अंतीम हुकुमनामा संमत होई पर्यंत वाढवला गेला असता, ते खालील वस्तुस्थिती वरुन स्पष्ट होते.

वादीला माहीत होते की,शंकर सीताराम यांनी चालविलेल्या दारूच्या दुकानांचा परवाना १ एप्रिल, १९४६रोजी संपुष्टात येणार होता आणि परवान्याची मुदत संपल्यानंतर तो हा व्यवसाय संयुक्तपणे किंवा आपल्या भावांच्या भागीदारीत नव्हे, तर स्वतंत्र पणे चालवण्यास उत्सुक होता.१२ डिसेंबर १९४५ रोजी त्याने त्याच्या भावांना, सीताराम सोनटक्के आणि इतरांना प्लीडरद्वारे नोटीस दिली, त्या मध्ये इतर गोष्टींबरोबरच पुढील गोष्टी नमूद केल्या होत्या:-

“ सदर ठिकाणच्या दारुच्या दुकानांचा (परवान्याचा) कालावधी मार्च १९४६ च्या अखेरीस संपतो.त्यामुळे, सदर कालावधीच्या समाप्ती नंतर, माझ्या अशीलाला संयुक्तपणे किंवा तुमच्या पैकी कोणाशीही, भागीदारीत, दारूच्या दुकानाचा व्यवसाय करण्याची इच्छा नसल्यामुळे, तो १एप्रिल, १९४६ पासून स्वतंत्रपणे त्याच्या इच्छेनुसार एक किंवा अधिक दारूची

दुकाने चालवू इच्छित होता.दुकानांच्या लिलावासाठी (खरेदीसाठी) आवश्यक असलेले पैसे माझा अशील त्रयस्थ व्यक्तींकडून स्वत:च्या जवाबदारीवर कर्ज घेऊन,उभे करणार होता आणि या पैश्यांशी, कौटुंबिक व्यवसायाचा, मालमत्तेचा आणि रोख रक्कमेचा,ज्या विषयी न्यायालयात वाद सुरु आहे, काहीही संबंध असणार नाही. या नोटीस द्वारे माझा अशील तुम्हाला या वस्तुस्थिती बाबत स्पष्टपणे सूचीत करतो की, अशा प्रकारे त्याने खरेदी केलेली दारूची दुकाने केवळ त्याच्या मालकीची असतील आणि तुमच्यापैकी कोणाशीही त्यांचा संबंध असणार नाही व ती स्वतंत्रपणे त्याच्याद्वारे चालवली जातील.१ एप्रिल, १९४६ पासून सुरू होणाऱ्या नवीन सरकारी लिलावात माझ्या अशीलाने अशा प्रकारे खरेदी केलेल्या दारुच्या दुकानांमध्ये हस्तक्षेप करण्याचा किंवा ढवळाढवळ करण्याचा तुमच्या पैकी कोणालाही कायदेशीर अधिकार राहणार नाही आणि जर तुमच्या पैकी कोणी द्वेषपूर्ण हेतूने माझ्या अशीलाच्या सदर व्यवसायात अगदी थोडा देखील हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला, तर माझा अशील तुम्हाला सर्वांना, होणाऱ्या हानीसाठी आणि इतर नुकसानासाठी आणि खर्चासाठी पूर्णपणे जबाबदार धरेल आणि त्या करिता तुमच्या विरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करेल.”

ही नोटीस वादीच्या हेतूबद्दल खऱ्या अर्थाने मार्गदर्शक सूचना करणारी अशी आहे,कारण त्याने केवळ स्वतःसाठीच दारूची दुकाने चालवावी अशी त्याची इच्छा होती आणि त्या व्यवसायातून उत्पन्नाचा, नफ्याचा स्वतःसाठी लाभ घ्यावा, त्यासाठी तो त्याच्या भावांना जवाबदार असू नये, या व्यतिरिक्त दुसरी काही नव्हती, हे यातून स्पष्ट होते.जरी वादी म्हणतो की, त्याला कर्जाऊ रक्कम घेऊन दारूच्या दुकानांच्या लिलावाचे पैसे द्यायचे होते, तरी तो खरोखरच लाभाच्या [व्हॅनटेज च्या] स्थितीत होता. त्याच्याकडे हातात रु.१३,०००/- रोख

उपलब्ध होते,या उलट,त्याच्या भावांकडे रोख रु.३०००/- एवढीच रक्कम होती.३१ मार्च, १९४६ पर्यंतच खाते हिशोब घेतला जाईल,(खाती घेतली जातील) या तडजोडीतील तरतुदीचे महत्त्व या नोटीसीतून स्पष्ट झाले आहे.३१ मार्च ,१९४६ नंतर त्याने स्वतंत्रपणे दारूचा व्यवसाय चालवावा, त्यामध्ये त्याच्या भावांनी हस्तक्षेप करु नये, अशी वादीची इच्छा असल्यामुळे, त्याला त्याच्या भावांनी चालविलेल्या इतर व्यवसायांशी असलेले संबंध तोडून टाकण्यास सक्तीने सहमती दर्शवावी लागली.ही व्यवस्था सर्वभावांना न्याय्य आणि वाजवी वाटत असल्याने आणि कोणत्याही पक्षाला दुसऱ्यापेक्षा जास्त फायदा देत नसल्याने, स्पष्टपणे मान्य झाली होती. हा तडजोडीच्या मसूद्याचा आम्ही काढलेला अर्थ विचारात घेता, मोटार व्यवसायाच्या संदर्भात वादीचे नवीन दावा दाखल करून, तडजोडीच्या व्यवस्थेतून माघार घेण्याचे, वर्तन आम्हाला तरी प्रामाणिक वाटते. यात काहीच शंका नाही की , आधीच्या खटल्यातील याचिकेत वादीने, सर्व कौटुंबिक स्थावर आणि जंगम मालमत्तेची वाटणी आणि कौटुंबिक व्यवसायांच्या संदर्भात सर्व खात्यांचे अंतिम निर्धारण करण्याची मागणी केली होती.हे देखील महत्त्वाचे आहे की, तडजोडीनंतर वादी(बालकृष्ण) ने दिवाणी न्यायाधीशांसमोर एक अर्ज दाखल केलाहोता, ज्यामध्ये त्याने असा आरोप केला होता की, जेव्हा त्याने तडजोडीस सहमती दर्शवली होती की, विविध व्यावसायिकांची खाती ३१मार्च, १९४६पर्यंत असली पाहिजेत, तेव्हा तो त्याच्या कायदेशीर अधिकाराबाबत अनभिज्ञ होता, चुकीच्या समजा खाली होता. कारण, त्याला असे वाटले होते की, जेव्हा खाती एका विशिष्ट तारखेपर्यंत घेतली जातील, तेव्हा त्या तारखेनंतर संयुक्त कुटुंब मालमत्तेचा वापर कुटुंबातील काही सदस्यांना ,वादीला वगळून, स्वतःसाठी नफा कमावण्यासाठी करू दिला जाणार नाही.वादी पुढे म्हणतो

की, ३१ मार्च,१९४६ नंतर संयुक्त कुटुंबाचा व्यवसाय एकतर पूर्णपणे बंद होईल किंवा मध्यस्थ किंवा आयुक्तांमार्फत तो चालविला जाईल आणि त्यातून मिळणारा नफा सर्वांना, त्यांच्या हिश्श्यांनुसार वाटप करण्यासाठी, न्यायालयात जमा केला जाईल, अशा भावनेने त्यांनी काम केले. २२ नोव्हेंबर,१९४७ रोजी अर्ज करण्यात आला होता.तथापि, त्याच्या वकिलाने ६ एप्रिल, १९४८ रोजी म्हटलेः- "अर्जातील मागणीसाठी स्वतंत्र दावा दाखल करुन त्याच्या माध्यमातून पाठपुरावा करण्याची इच्छा असल्याने अर्जदार त्याचा अर्ज पुढे चालवू इच्छीत नाही." आणि न्यायालयाने आदेश दिलाः- "अर्ज रद्द केल्यामुळे, तो निकाली काढला जातो.” "या अर्जाचा संदर्भ देतांना उच्च न्यायालयाचे विद्वान न्यायाधीश असे निरीक्षण करतातः- "यावरून हे स्पष्ट होते की १ एप्रिल ,१९४६ नंतर अनेक व्यवसायांच्या नफ्याची कल्पना उभय पक्षांच्या मनात होती; परंतु इतर व्यवसायांचे हिशेब १ एप्रिल, १९४६ नंतर घेतले जावेत,अशी मागणी करण्याच्या संदर्भांत सर्वच जण निष्काळजी होते.(किंवा अनावधानाने अशी मागणी करण्याचे त्यांच्या कडून राहून गेले.)त्यापैकी एक व्यवसाय दारूचा होता, जो ३१ मार्च, १९४६ रोजी संपुष्टात येणार होता, हे त्यांना माहीत होते. परंतु; दुसरा व्यवसाय देखील होता; तो किराणा दुकानाचा होता, जो फारसा मोठा व्यवसाय नव्हता.पण तरीही तो होता आणि सबब, अपीलकर्त्यांतर्फे मांडण्यात आलेल्या युक्तिवादात तथ्यांश आहे आहे की, या बाबतीत पक्षकारांकडून दुर्लक्ष झाले असे नाही, परंतु पक्षकारांस माहीत होते की, व्यवसाय नंतर चालू राहू शकतात; परंतु जर ते चालू राहिले तर , १एप्रिल, १९४६ नंतर चालविलेल्या व्यवसायांच्या खात्यांसाठी, तडजोडीच्या हुकुमनामाद्वारे हिशोब घेण्याची व्यवस्था करुन,ठेवण्याची विशेष काळजी पक्षकारांकडून घेतली गेली नाही. "हे सर्व सांगितल्या नंतर ते(उच्च न्यायालय) अशी

टिप्पणी नोंदवितात की,"वादीच्या मोटार व्यवसाय चालविण्याच्या अधिकारावर तडजोडी मुळे स्पष्टपणे नकारात्मक परिणाम झालेला नाही." हा निष्कर्ष आम्ही मान्य करू शकत नाही.तडजोडीच्या खऱ्या परिणामाच्या संदर्भात, चूक किंवा गैरसमजाबद्दल वादीने खटल्यादरम्यान वर उद्धृत केलेले आक्षेप नकारात्मक आहेत, आणि ते, हे दर्शवितात की वादीने अनावधानाने तडजोड करतांना निर्णायक तारखेनंतर हिशोब देण्याचा अधिकार दिला आणि त्यानंतर उभय पक्षांची स्थिती सम भागिदारांपैकी एक,अशी झाली.जर वादीचा खरोखरच असा हेतू होता की, मोटार व्यवसायाचे किंवा इतर सर्व व्यवसायांचे हिशोबअंतीम हुकुमनामााच्या तारखेपर्यंत घेतले जावेत, तर ३१ मार्च, १९४६ चा उल्लेख करण्यात काही अर्थ नव्हता.न्यायालयाने प्राथमिक हुकुमनामा पारीत केल्यानंतर, सर्व मालमत्तेचे सरस-निरस वाटप करणे आणि खात्यांच्या तपासणीत आढळल्याप्रमाणे अंतीम हुकुमनामााच्या तारखेपर्यंत संबंधीतांना पैसे देणे , हा सामान्य मार्ग होता.परंतु खात्याचा कालावधी मर्यादित करणाऱ्या तडजोडीसाठी राजी होतांनाच वादीने मागणी केली असती तर,वादीला आता त्याने नवीन खटल्यात मागितलेला दिलासा मिळाला असता. कारण, अंतीम हुकुमनामााच्या तारखेपर्यंत सर्व व्यवसायांचे हिशोब घेतल्या गेले असते.नैसर्गिकन्याय रोखल्याबद्दल आणि खात्यांचा हिशोब ३१मार्च,१९४६ पर्यंतच घेण्यास बाध्य केल्याबद्दल वादीने स्वतःचेच आभार मानले पाहिजेत! दुसरीकडे, जरी उत्तरवादीक्र.१आणि२ यांच्या ताब्यात मोटार व्यवसाय होता आणि या व्यवसायातून दोन मोटर बसेस द्वारे त्यांनी काही पैसेही मिळविले असले तरी सुद्धा वादीला या प्रकरणात आणखी कोणती ही खरी तक्रार नाही, त्याची इच्छा दारूचा व्यवसाय स्वतंत्रपणे चालवण्याची होती,या गोष्टीची तीव्रता वर नमूद केलेल्या नोटीस/सूचनेवरुन स्पष्ट होते;शिवाय,

त्या व्यवसायाची फळे मिळण्यापासून त्यांना रोखले गेले नव्हते.मोटार व्यवसाय जर टिकून राहिला असता तर वादीने त्याच्या नुकसानीचा भार वाटून घेण्यास सहमती दर्शवली असती, हे समजणे कठीण आहे.सबब, आमचे असे मत आहे की ३१ मार्च, १९४६ नंतर, मोटार व्यवसायासह संयुक्त कुटुंब व्यवसायांचा कोणताही हिशोब घेण्याबाबतचा संपूर्ण वाद एकदाच पूर्णपणे संपुष्टात आला आणि वादी तडजोडीच्या अटींना आणि त्यानंतर पारीत झालेल्या हुकुमनाम्याला बांधील आहे.या निष्कर्षाचा स्पष्ट परिणाम असा होतो दावा की, वादीला सध्याच्या खटल्यातील प्रश्नाचे पुनरुज्जीवन करण्यास पूर्व न्यायनिर्णयाच्या प्रतिबंधाच्या तत्त्वाने प्रतिबंधीत केले आहे.संमतीचा हुकुमनामा हा, उभयपक्षांच्या सहमतीने पारीत केलेल्या आदेशाप्रमाणेच उभय पक्षांवर बंधनकारक असतो, हे सर्वस्वी निश्चित आहे.प्रस्तुत प्रकरणी,तडजोड ही फसवणूक, चुकीची मांडणी, गैरसमज किंवा चुकांमुळे दूषित झालेली नाही, असे आढळून आल्याने, त्या नुसार पारित केलेल्या हुकुमनामाावर पूर्वीच्या न्यायनिवाड्याचे बंधन येते.आमचे असेही मत आहे की, वादीचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश- २, नियम २(३) च्या तरतुदींद्वारे प्रतिबंधित आहे.वादीने ३१मार्च, १९४६ पर्यंतच हिशेबाची आपली मागणी सिमीत करून, प्रत्यक्षपणे पणे नसले तरी अप्रत्यक्षपणे, त्या कालावधी नंतरच्या हिशोबाचा आपला दावा सोडून दिला होता.उपनियम (3) स्पष्टपणे नमूद करतो की, जर एखाद्या व्यक्तीने, न्यायालयाची परवानगी न घेता, तो पात्र असलेल्या सर्व मागण्यांसाठी खटला दाखल करणे टाळले, तर तो वगळलेल्या कोणत्याही मागणीसाठी नंतर खटला दाखल करु शकत नाही.त्यानंतरच्या खटल्यातील कारवाईचे कारण पहिल्या खटल्यातील कारवाईच्या कारणापेक्षा वेगळे होते, या उच्च न्यायालयाच्या मताशी आम्ही

सहमत नाही.पहिल्या खटल्यातील कारवाईचे कारण म्हणजे वादीची, त्याच्या भावांपासून वेगळे होण्याची आणि वादातील कौटुंबिक मालमत्ता विभाजित करण्याची इच्छा हे होते.त्या खटल्यात कोणतीही मालमत्ता राखून न ठेवता, संपूर्ण मालमत्ता समाविष्ट केली गेली आणि तडजोड केली गेली, याचाच अर्थ, वादीने या संदर्भातील आपली हिशोबाची मागणी, प्रत्यक्षपणे जरी नाही तरी अप्रत्यक्षपणे सोडून दिली होती.३१ मार्च, १९४६ नंतर मोटार व्यवसायाच्या हिशोबाची त्याची मागणी व त्याचा त्यानंतरचा दावा त्याच कारणांवर आधारित आहे , जे त्याने जाणूनबुजून सोडून दिले होते.सबब, आम्ही स्पष्ट करतो की, दोन्ही खटल्यांमधील कारवाईचे कारण समान असल्याने, दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश २, नियम २ (३) अंतर्गत वादीचा दावा प्रतिबंधित आहे.दिवाणी प्रक्रिया संहितेच्या पूर्वन्यायनिर्णयाच्या प्रतिबंधाचे तत्व आणि आदेश २, नियम २(३), या दोन्हींद्वारे खटला प्रतिबंधित असल्याने, भारतीय न्यास कायद्याचे कलम ९० लागू होण्याविषयी आणखी कोणताही प्रश्न, कदाचित, या परिघांतर्गत उद्भवू शकत नाही.

याचा परिणाम असा होतो की, आम्ही अपीलाला परवानगी देतो आणि संपूर्ण खर्चासह दावा फेटाळतो.

x-x-x-x

-अस्वीकरण-

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारांस त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही

कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x